# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** आटपाडी
**Year (वर्ष):** 2023
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0061
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/02/2023 23:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 21/02/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/02/2023
**Time From (वेळेपासून):** 17:38 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/02/2023 **Time (वेळ):** 22:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 035
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/02/2023 23:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जुन्या तहसिलदार कार्यालयाचे,बाजुस मोकळे जागेत आटपाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जीवन आकाराम सावंत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा गोमेवाडी, ता आटपाडी, ,आटपाडी,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा गोमेवाडी, ता आटपाडी, ,आटपाडी,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेबुब नबिलाल बागवान | | | 1. मुपो लोहारा बुद्रुक इंदिरानग, जि उस्मानाबाद ,आटपाडी,सांगली, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब दि.21.02.2023

मी जीवन आकाराम सावंत, वय 48 वर्ष, व्यवसाय:- नोकरी (प्राथमीक शिक्षक जिल्हा परिषद शाळा कदमवाडी) रा. गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली मो.नं. 9420340110.
मी वरील प्रमाणे असुन मी जिल्हा परिषद शाळा कदमवाडी येथे प्राथमीक शिक्षक म्हणुन नोकरीस आहे. मी गोमेवाडी येथे माझे कुटुंबासह राहणेस आहे.
आटपाडी पोलीस ठाणे येथे निलेश सोहनी व इतर यांचे विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील फिर्यादी यांनी मा न्यायालयापुढे दिलेल्या जबाबामध्ये माझे नांव घेतलेने आटपाडी पोलीस ठाणेकडून माझे विरुद्ध मा विशेष/तालुका कार्यकारी दंडाधिकारी आटपाडी यांचेकडे चॅप्टर केस पाठवलेली आहे. सदर चॅप्टर केसची सुनावणी निवासी नायब तहसिलदार श्री शिंदे साहेब यांचे समक्ष सुरु आहे. सदर चॅप्टर केस मध्ये मला पर्सनल बॉण्डवर सोडण्यासाठी व चॅप्टर केस वरीष्ठांना सांगुन निकाली काढण्यासाठी तहसिलदार कार्यालय आटपाडी येथील चॅप्टर केस टेबलला काम करणारे महेबूब बागवान, महसुल सहायक यांनी माझ्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केलेली असल्या बाबतची तक्रार सांगुन वर नमुद मजकुरची हस्तलिखीत सविस्तर तक्रारी अर्ज दि.20.02.2023 रोजी पुजारी साहेबांकडे दिला होता.
त्यानंतर पुजारी साहेबंानी मला त्यांचे सोबतचे दोन सरकारी पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. पुजारी साहेबांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली. त्यानंतर पुजारी साहेबांनी मी महसुल सहायक महेबुब बागवान यांचे विरुद्ध दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने दि. 20.02.2023 रोजी पंचा समक्ष केले पडताळणी कारवाईमध्ये महेबुब बागवान यांनी चॅप्टर केसचे प्रकरण निकाली काढण्यासाठी माझ्याकडे चर्चेअंती 3000/- रुपये लाचेची मागणी करुन 3000/- रुपये लाच रक्कम दोन दिवसात घेऊन येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले. पुजारी साहेबांनी मला व पंच श्री माने यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण वरील प्रमाणे संभाषण झाल्याची खात्री केली.
दि.21.02.2023 रोजी महसुल सहायक महेबुब बागवान यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 3000/- रुपये नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे समोरील डावे बाजुस असले खिश्यामध्ये ठेवल्या, त्यानंतर मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पुजारी साहेबांनी योग्य त्या सुचना दिल्या. सापळा कारवाई दरम्यान महसुल सहायक महेबुब बागवान यांनी पंच श्री माने यांचे समोर दिघंची आटपाडी रोडवरील हॉटेलमध्ये चहा पिऊन तहसिल कार्यालय आटपाडी येथे आम्ही जात असताना जुन्या तहसिल कार्यालयाचे बाजुस मोकळे जागेत बागवान साहेबांनी हाताने इशारा करुन माझेकडे लाचेची मागणी केल्यानंतर मी माझे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये अँथ्रासीन पावडर लावुन ठेवली लाच रक्कम 3,000/- रुपये माझे उजवे हाताने बाहेर काढुन बागवान साहेब यांना 3000/- रुपये असे म्हणुन त्यांचे समोर धरली असता बागवान साहेब यांनी 3000/- रुपये माझेकडून त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुच्या खिश्यामध्ये ठेवले. त्यानंतर मला या केसमध्ये विनाकारण गोवले असल्याचे बागवान साहेब यांना सांगुन चॅप्टर केस संपवुन टाकणे बाबत विनंती केली असता त्यांनी एक महीन्यानंतर एकदा तारखेला यावे लागेल असे सांगीतले. मी व बागवान साहेब बोलत बोलत तहसिल कार्यालयात जात असताना मी माझे डावे हाताने माझ्या पॅन्टच्या समोरील डावे बाजुच्या खिश्यातील हात रुमाल बाहेर काढुन त्यांने तोंड पुसुन लाच स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावरून पुजारी साहेब, पाटील साहेब, पंच जगदाळे व सापळा पथक असे तहसिल कार्यालय आटपाडी येथील महसुल शाखेत आले व त्यांनी महसुल सहायक बागवान यांना 17.28 वा. चे सुमारास पकडले.त्यावेळी लाचेची रक्कम 3000/- रुपये दोन

पंचासमक्ष महसुल सहायक बागवान यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुच्या खिश्यामधून हस्तगत केली आहे. सदर ठिकाणी पुजारी साहेबांनी महसुल सहायक बागवान यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव महेबुब नबिलाल बागवान, वय 42 वर्ष, व्यवसाय - महसुल सहायक, तहसिल कार्यालय आटपाडी, रा. दत्त नगर, मज्जीद समोर आटपाडी, मुळ रा. मु.पो. लोहारा बुद्रुक इंदिरानगर, जि. उस्मानाबाद असे असल्याचे सांगीतले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर सापळापूर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह आटपाडी येथे पूर्ण करण्यात आली.
तरी दि.20.02.2023 रोजी लोकसेवक श्री महेबुब नबिलाल बागवान, वय 42 वर्ष, व्यवसाय - महसुल सहायक, तहसिल कार्यालय आटपाडी, रा. दत्त नगर, मज्जीद समोर आटपाडी, मुळ रा. मु.पो. लोहारा बुद्रुक इंदिरानगर, जि. उस्मानाबाद यांनी माझ्याकडे चॅप्टर केसचे प्रकरण निकाली काढण्यासाठी चर्चेअंती 3000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच दि.21.02.2023 रोजी 15.25 वा. ते 17.28 वा. च्या दरम्यान लोकसेवक श्री महेबुब नबिलाल बागवान यांनी स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून माझे विरुद्धची तहसिल कार्यालय आटपाडी येथे सुरु असलेली चॅप्टर केस निकाली काढण्यासाठी माझ्याकडे 3,000/- रुपये लाचेची पुन्हा मागणी करुन जुन्या तहसिल कार्यालयाचे बाजुस मोकळे जागेत माझ्याकडून 3,000/- रुपये लाच रक्कम स्वतः स्वीकारली आहे, म्हणून माझी लोकसेवक महेबुब नबिलाल बागवान, महसुल सहायक, तहसिल कार्यालय आटपाडी, जि. सांगली यांचे विरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं◌्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Sharad Shankrrao Memane (I (Inspector)) / POBN84064 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sharad Shankrrao M

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN84064



Scanned with OKEN Scanner